**नि.फौ.ख.क्र.६०९/२०२३**
शासन–वि–तानाजी.
नि.क्र.३०.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – तुषार सोपानराव लव्हे,
वय – ३८ वर्षे, व्यवसाय – वेल्डींग वर्कशॉप,
राहणार– चौफुला, बोरीपारधी, ता. दौंड, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**

१. दि. ०३.०३.२०२३ सकाळी ९.०० वाजता पोलिस कॉन्स्टेबल चोरमले यांनी चौफुला येथील हर्ष मेडिक्लेम ऑफिस येथे बोलावले होते. या ठिकाणी गेल्यावर दक्षिणेकडून त्या गाळयात प्रवेश केल्यानंतर पाहिले की, तेथे फर्निचरचे काम चालू होते. ती ८ बाय १० ची खोली होती. ज्यामध्ये पश्चिमेला पार्टीशन करुन ऑफिस तयार केले होते आणि उर्वरित जागेत वेटींग रुम तयार केले होते. त्या ठिकाणी एक टेबल ठेवलेले होते आणि समोर कॉन्फरन्स रुमला जाण्याचा दरवाजा होता. त्या ठिकाणी निळया रंगाचे १ इंच मापाचे पाइपचे ७–८ तुकडे पडलेले होते. त्या ठिकाणी उपस्थित फिर्यादीने तिला त्या पाइपने मारहाण झाल्याचे कथन केले होते. पोलिसांनी घटनास्थळी दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा तयार केला आणि त्यावर माझी सही घेतली. आता मला दाखविण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर २ नं. ची सही माझी आहे. त्यास **नि. ३१** देण्यात येते. त्या ठिकाणचे पाईप्स पाहिल्यास ओळखु शकतो. आता मला दाखविण्यात आलेले निळया रंगाचे प्लास्टीक पाईपचे आठ तुकडे वस्तु क्र.अ तेच आहेत. सदर मुद्देमाल व त्याच्यावर असलेल्या लेबलवरील २ नंबरची सही साक्षीदाराने ओळखलेले आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. बी. गिरमकर यांच्यामार्फतः–**

२. माझे वेल्डींग वर्कशॉप आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वेल्डींग वर्कशॉप त्या दवाखान्याच्या समोर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी वर्कशॉपच्या वरतीच राहायला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी शेंडगे डॉक्टरांना चांगल्या रिते ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या हॉस्पीटलमध्ये काम करणा–यांची माझी तोंडओळख आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा हे घटना घडली त्या ठिकाणाचा केला. हे म्हणणे खरे आहे की,

पंचनाम्याला घटना घडली त्या खोलीशिवाय आसपासच्या जागांचा देखील नकाशा जोडलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल पाइपचे तुकडे हे रेनोवेशनचे काम चालू असलेल्या कोणत्याही ठिकाणी मिळू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सरतपासात सांगितल्या व्यतिरिक्त त्या ठिकाणी इतर कोणत्याही वस्तू नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी सोनाली झगडे यांना ओळखतो. साक्षीदार म्हणतो, त्या हॉस्पीटलमध्ये कामाला कधीही नव्हत्या म्हणून मी त्यांना ओळखत नाही. आम्ही पंचनामा करण्यासाठी गेलो त्यावेळी सोनाली झगडे त्या ठिकाणी हजर नव्हत्या. पंचनामा करतेवेळी मी, पोलिस डिपर्मिंटचे चोरमले व इतर आणि भुजबळ हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, सोनाली झगडे यांना ओळखत असल्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.

दिनांकः- ०७.०१.२०२५